# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य State: महाराष्ट्र  जिल्हा District: मुंबई  पोलीस ठाणे Police Station: ला.प्र.वि  पहिली खबर क्र. FIR No.: १६  वर्ष Year: २०२६  दिनांक Date: ०२/०६/२०२६

2. (i) अधिनियम Act: भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८  कलमे Sections: ७
   (ii) अधिनियम Act ..........  कलमे Sections ..........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ..........

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day ..........  तारीख पासून Date from: २६/०५/२०२६  वेळ Time: १०:०० वा  तारीख पर्यंत Date to: ०१/०६/२०२६  वेळ Time: १६:१० वा

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा (Tick applicable portion).

(1) ००.०० ते ०३.००  (2) ०३.०० ते ०६.००  (3) ०६.०० ते ०९.००  (4) ०९.०० ते १२.००  (5) १२.०० ते १५.००
(6) १५.०० ते १८.००  (7) १८.०० ते २१.००  (8) २१.०० ते २४.००

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S.  तारीख Date: ०१/०६/२०२६  वेळ Time: १०:०० वा.

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No.: ०१  तारीख Date: ०२/०६/२०२६  वेळ Time: ०१:३० वा.

4. माहितीचा प्रकार Type of Information ..........  लेखी / तोंडी Written / Oral: लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. ..........  चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O. P. Name and No. ..........

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name: प्रादेशिक परिवहन कार्यालय (पूर्व)  ठिकाणाचे नंबर No. if any ..........  गल्ली Ward ..........  रस्त्याचे नाव Name of road ..........

जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place: [illegible]  गाव Village: [illegible] (प)  पोस्ट Post ..........  तालुका Taluka: बोरीवली  जिल्हा Dist.: मुंबई  राज्य State: महाराष्ट्र

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ..........  तालुका Taluka ..........  जिल्हा Dist. ..........  राज्य State ..........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव Name: नितीन भोसले  (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name: तुकाराम भोसले

(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age: ३६ वर्षे.  (d) राष्ट्रीयत्व Nationality: भारतीय  फोन नं. Phone No.: 9561646933

(e) पारपत्र क्रमांक Passport No. ..........  दिल्याचा दिनांक Date of issue ..........  दिल्याचे ठिकाण Place of Issue ..........  (f) व्यवसाय Occupation: नोकरी पोलीस निरीक्षक

(g) धर्म Religion: हिंदू  जात Caste: मराठा  जनजात Sub-Caste ..........

(h) पत्ता Address: नेहरू नगर (पूर्व)  गल्ली/सर्व्हे नं. Ward: ८४ [illegible]  घर/नाव नं. House Name No.: २०५  फोन/मो. नं. Phone No. ..........  पॅन नं. Pan No. ..........  वोटर्स नं. Card No. ..........

रस्त्याचे नाव Road ..........  जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ..........  गाव Village ..........  पोस्ट Post ..........  पो. स्टे. P. Stn. ..........

तालुका Taluka: कुर्ला (पूर्व)  जिल्हा Dist.: मुंबई  राज्य State: महाराष्ट्र  सध्याचा पत्ता Present Address: वरीलप्रमाणे.

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

मिथुन विलास आडे, वय- ३६ वर्षे, पद- लिपीक टंकलेखक, प्रादेशिक परिवहन कार्यालय, बोरीवली (पूर्व), मुंबई. रा.ठि. फ्लॅट नं- डी/604, 6 वा मजला, [illegible], [illegible], मिरारोड, ठाणे - 401107.

(G.C.P.) K 1043 (A) (1000–1-2025)

यातील फिर्यादी श्रीमती. निता तुकाराम भोसले यांच्या दिनांक. ०२/०६/२०२६ रोजी स्वतंत्र कागदावर टंकलिखित करण्यात आलेला जबाब हेच गुन्ह्याची प्रथम खबर समजण्यात यावी.

समक्ष,

( प्रविण पावले )
सहायक पोलीस आयुक्त,
ला.प्र.वि. मुंबई.

PZ N.T. Bhosule

फिर्याद दिनांक ०२/०६/२०२६

मी, निता तुकाराम भोसले, वय ३७ वर्षे, व्यवसाय : नोकरी (पोलीस निरीक्षक), नेमणुक – लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, मुंबई. मोबाईल क्रमांक ९५६१६४६९३३.

मी वरील प्रमाणे असून, ऑगस्ट २०२४ पासून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग येथे 'पोलीस निरीक्षक' या पदावर नेमणुकीस आहे.

मी, दिनांक ०१/०६/२०२६ रोजी ला.प्र.वि. मुंबई कार्यालयात सकाळी ०९.४० वा. दरम्यान कर्तव्यावर हजर झाले. मा. वरिष्ठांनी मला तसेच स.पो.आ. श्री. मानसिंग पाटील असे दोघांना त्यांच्या कार्यालयात बोलावून ला.प्र.वि. कार्यालयात लोकसेवकाच्या विरोधात तक्रार देण्याकरीता आलेले श्री. मकसुद मुल्ला यांची ओळख करून देवून त्यांची सविस्तर तक्रार ऐकून सापळा अधिकारी म्हणून मला पुढील योग्य ती कारवाई करण्याचे आदेशित केले. तसेच स.पो.आ. मानसिंग पाटील यांना पर्यवेक्षक अधिकारी म्हणून नियूक्त केले. त्यानंतर मी व सपोआ मानसिंग पाटील तक्रारदार श्री. मकसुद मुल्ला यांना माझे कक्षात घेवून आलो.

मी आणि सपोआ मानसिंग पाटील यांनी तक्रारदार श्री. मकसुद मुल्ला यांच्याकडे त्यांच्या तक्रारीबाबत विचारणा केली असता, त्यांनी माहिती दिली की, त्यांचे पुर्ण नाव मकसुद जैनुद्दीन मुल्ला, वय ६४ वर्षे, व्यवसाय– ट्रॅव्हल्स व्यवसाय, राहणार– फ्लॅट नं. ६०५, मालवणी पारस को. ऑप. हौ. सोसायटी, मालवणी म्हाडा, आशा टॉवर समोर, मालवणी, खारोडी, मालाड (प), मुंबई असे आहे. तक्रारदार श्री. मकसुद मुल्ला यांचे 'मुन्ना ट्रॅव्हल्स्' नावाचा शाळांना बसेस पुरविण्याचा व्यवसाय असुन त्यांच्या एकुण १० बसेस आहेत. त्या बसेस तक्रारदार यांनी वेगवेगळया शाळांना भाडेतत्वावर लावलेल्या आहेत. दिनांक १९/०६/२०२५ रोजी बोरीवली येथे आर.टी.ओ. अधिकारी यांनी तक्रारदार यांचे बस क्र. एमएच–०२–एफजी–२९७३ या बसवर फाईन मारला होता. त्यामूळे तक्रारदार हे दिनांक २७/०५/२०२६ रोजी बोरिवली आरटीओ येथे गेले होते. बोरिवली आरटीओ येथे जावून तक्रारदार यांनी खटला विभागातील लिपीक टंकलेखक श्री. मिथुन आडे यांना त्यांचे बसवर मारलेल्या फाईन बाबत विचारणा केली. त्यावेळी श्री. मिथुन आडे यांनी संगणकावर तपासुन चलानची प्रिंट काढून तक्रारदार यांना दिली. तसेच तक्रारदार यांचे बसवर चालकाने लायसन्स व बॅच जवळ बाळगले नसलेबाबत तसेच इन्शुरन्स व पीयुसी संपलेबाबत व वाहन अस्वच्छ या कारणास्तव एकुण रू. २६,५००/– इतका फाईन असुन तो भरायचा आहे असे सांगितले.

त्यावेळी तक्रारदार यांनी फाईन खूप जास्त असल्याने लिपीक टकलेखक श्री. मिथुन आडे यांना ''फाईन कमी होईल का?'' असे विचारले असता, श्री. मिथुन आडे यांनी तक्रारदार यांना बसच्या चालकाचे लाईसन्स व बॅच सादर करण्यास सांगितले. लाससन्स व बॅच सादर केल्यानंतर तक्रारदार यांचे बसचा दंड एकुण रूपये २६,५००/– हा कमी करून तो रूपये ४,५००/– एवढा भरावा लागेल व त्यानंतर तक्रारदार यांचे बसवरील सर्व फाईन क्लिअर होवुन जाईल असे सांगितले. तसेच त्यांनी तक्रारदार यांचे बसवरील फाईन कमी करण्याकरीता त्यांच्या स्वत:करीता व त्यांचे वरिष्ठ अधिकारी असिस्टंट आरटीओ श्री. श्याम कासार साहेब यांच्याकरीता रू. ५,०००/– इतक्या रक्कमेची लाचेची मागणी केली आहे.

तक्रारदार श्री. मकसुद मुल्ला यांची श्री. मिथुन आडे, लिपीक टंकलेखक, नेमणुक प्रादेशिक परिवहन कार्यालय, बोरीवली, मुंबई यांना लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने त्यांचेवरती कायदेशीर कारवाई करण्याकरिता त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे दिनांक ०१/०६/२०२६ रोजी आले आहेत. त्यावेळी मी आणि सपोआ मानसिंग पाटील यांनी तक्रारदार श्री. मकसुद मुल्ला यांना त्यांची तक्रार त्यांच्या

स्वत:च्या हस्ताक्षरात लेखी देण्यास सांगितली. त्याप्रमाणे तक्रारदार श्री. मकसुद मुल्ला यांनी त्यांच्या स्वहस्ताक्षरात तक्रार अर्ज लिहून दिला.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने तात्काळ पडताळणी कारवाई करण्याकरीता प्रभारी अंमलदार पो.ह. शेमडकर यांना दोन शासकीय पंच बोलाविण्यास सांगितले. त्याप्रमाणे दोन शासकीय पंच नामे १) श्री. सुशांत शरद करडे, वय ४८ वर्षे, व्यवसाय– नोकरी, (सहायक महसुल अधिकारी) उप जिल्हाधिकारी (अति/निष्का), तळमजला, टोपीवाला कॉलेज इमारत, सरोजनी नायडू रोड, मुलूंड पश्चिम, मुंबई. तसेच २) सौ. सिमा गजानन मलबारी, वय–४४ वर्षे, व्यवसाय–नोकरी, (परिक्षण भुमापक, नगर भुमापन अधिकारी, मालाड), कार्यालय पत्ता – प्रशासकीय इमारत, पाचवा मजला, नाटकवाला लेन, बोरीवली (प), मुंबई. हे दोन पंच माझे कक्षात आले. त्यावेळी मी दोन्ही पंचांना तक्रारदार श्री. मकसुद मुल्ला यांची प्रथम ओळख करुन दिली आणि त्यांच्या तक्रारीची थोडक्यात हकिगत सांगितली. तसेच दोन्ही पंचांना तक्रारदार यांचा लेखी तक्रार अर्ज वाचण्यास दिला. पंचांनी तक्रारी अर्ज वाचून झाल्यानंतर त्यावर समक्ष म्हणून मी व पर्यवेक्षण अधिकारी म्हणून सपोआ मानसिंग पाटील तसेच दोन्ही पंचानी स्वाक्षरी केली. त्यानंतर पडताळणी क्र. ३९/२०२६, दि. ०१/०६/२०२६ प्रमाणे नोंद घेवून पुढील कारवाई चालू केली.

त्यानंतर, लोकसेवक श्री. मिथुन आडे हे लाचेची मागणी करतात किंवा कसे? याची पडताळणी करण्याच्या अनुषंगाने अवलंबविण्यात येणारी सर्व प्रक्रीया मी व सपोआ मानसिंग पाटील यांनी दोन्ही पंच तसेच तक्रारदार यांना समजावुन सांगितली. त्यानंतर मी, सपोआ पाटील, दोन्ही पंच व तक्रारदार श्री. मकसुद मुल्ला असे आम्ही गोपनीय कक्षात गेलो तेथे तक्रारदार व लोकसेवक यांचे मोबाईल फोनद्वारे किंवा समक्ष होणारे संभाषण कशाप्रकारे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात येईल याची माहिती दोन्ही पंच व तक्रारदार यांना दिली. त्यानंतर तांत्रिक शाखेचे पो.ह. गायकवाड यांचे मदतीने डि.व्ही.आर मधील नवीन कोऱ्या एस.डी. कार्डमध्ये आमचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत केले.

त्यानंतर दिनांक ०१/०६/२०२६ रोजी १३:०० वा. तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार असे पथक लाप्रवि कार्यालयातून पडताळणी कारवाईकरीता कार्यालयाच्या बाहेर उभ्या असलेल्या दोन शासकीय वाहनाने लोकसेवक कार्यरत असलेले कार्यालयाच्या दिशेने रवाना झालो. मी दिलेल्या आदेशाप्रमाणे शासकीय वाहन क्र. २ मधील पथक मेरी इम्यॅक्युलेट शाळा, दहीसर, मुंबई या परिसरात थांबुन राहिले होते. शासकीय वाहन क्र.१ मधुन मी, सपोआ मानसिंग पाटील, पो ह. गायकवाड, दोन्ही पंच व तक्रारदार असे लोकसेवक कार्यरत असलेले आरटीओ कार्यालयापासून काही अंतरावर 'खास पराठा' हॅटेलजवळ, कांदरपाडा दहिसर (प), मुंबई १४.०५ वाजण्याच्या दरम्यान आलो.

मी व सपोआ पाटील यांनी दोन्ही पंच, तक्रारदार यांना पडताळणी कारवाई दरम्यान घ्यावयाच्या दक्षता व करावयाची कारवाईबाबत सुचना दिल्या. माझे सांगण्याप्रमाणे तांत्रिक शाखेचे पोह. गायकवाड यांनी ठिक १४:२० वाजता डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तक्रारदार यांच्या कुर्त्याच्या आतील बनियनला कोणास दिसणार नाही किंवा संशय येणार नाही, अशा पध्दतीने अडकविला. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र. ०१, श्री. करडे हे लोकसेवक यांना भेटण्यासाठी ते कार्यरत असलेल्या कार्यालयाच्या दिशेने रवाना झाले. उर्वरीत पथक खास पराठा हॅटेलजवळ, कांदरपाडा दहिसर (प), मुंबई येथेच थांबून राहीलो.

समक्ष

N.T. Bhosle
PI

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार श्री. मकसुद मुल्ला व पंच श्री. करडे हे शासकीय वाहनाजवळ परत आले. त्यावेळी माझे सांगण्याप्रमाणे पो.ह. गायकवाड यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढून तो बंद करून माझे ताब्यात दिला. त्यावेळी १४:३८ वाजले होते. त्यानंतर मी, तक्रारदार व पंच श्री. करडे यांचेकडे विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, त्यांनी लोकसेवक श्री. मिथुन आडे यांची समक्ष भेट घेतली असता, लोकसेवकाने लायसन्सबाबत विचारणा केली. त्यावर तक्रारदार यांनी ड्रायव्हर गावी गेला असल्याने व त्याचा फोन त्याचा लागत नसल्याने लायसन्स नसल्याचे सांगितले. त्यावर लोकसेवक श्री. मिथुन आडे यांनी 'लायन्सस बॅच काहीच नाय' असे बोलुन 'लायन्सस साहेबांना नाय दिलं तर, वीस हजार फाईन लावाव लागणार' असे तक्रारदार यांना सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी लोकसेवकास 'तुम्ही काय करायंच तुमच्या हिशोबानी एडजस्ट करा आता' असे म्हटले. त्यावर लोकसेवक मिथुन बोलले की, '' **वीस हजार फाईन लावावचं लागणार लायसन्स, बॅचचा. ते नसल तर साहेबांना दयावे लागतील.**'' असे तक्रारदार यांना सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी, किती? साहेबांना किती दयायचे? किती साहेबांचं?' असे लोकसेवकास विचारले असता, लोकसेवक मिथुन आडे यांनी उजव्या हाताची पाच बोटे दाखवून 'फाईनल एवढं' असे खुनविले, त्यावर तक्रारदार यांनी 'काय फाईनल... पाचशे रूपये...बोलाना काय असेल ते.... क्लिअर बोलाना काय आहे त्यात काय...किती...' असे विचारले. लोकसेवक मिथुन आडे हे 'पाच' असे बोलले. तक्रारदार यांनी पुन्हा 'किती' असे विचारले असता, लोकसेवकाने 'वर पाच' असे म्हटले. त्यानंतर तक्रारदार यांनी 'पाच हजार रूपये आणि फाईन किती' असे पुन्हा विचारले असता, लोकसेवकाने 'साडे चार' असे म्हटले. त्यावर तक्रारदार यांनी लोकसेवकास '**साडे चार फाईन, पाच हजार रूपये वर, त्यात तुमचं आणि साहेबांच आलं, कुठल्या साहेबांच**' असे विचारले असता, लोकसेवक मिथुन यांनी 'कासार साहेब' असे बोलले. तक्रारदार यांनी 'कासार साहेबांच आणि तुमचं त्याच्यात आलं' असे विचारणा केली असता, लोकसेवकाने '**सगळं आलं**' असे म्हटले. त्यादरम्यान तक्रारदार याने 'काय कमी कराना पाचमध्ये' असे लोकसेवकास म्हटले असता, लोकसेवकाने कमीच आहे, इनलिगल, चोविस कमी केले, तुमचा मान ठेवुन कमी झाले' असे म्हटले, त्यावर तक्रारदार यांनी 'कायतरी कमी करा, मान ठेवून' असे विचारले असता, लोकसेवक मिथून यांनी '**चार हजार**' असे तक्रारदार यांना सांगितले. त्यानंतर लोकसेवक मिथुन आडे व तक्रारदार श्री. मुल्ला यांच्यात चर्चा झाल्याचे तक्रारदार यांनी सांगीतले.

त्यानंतर मी व सपोआ मानसिंग पाटील यांनी दोन्ही पंचांच्या समक्ष डिव्हीआर मध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकले असता, वरीलप्रमाणे लोकसेवकाने तक्रारदार यांचेकडे रू. ५०००/— ची मागणी करून तडजोडीअंती रू. ४०००/— स्विकारण्याचे मान्य केल्याचे आम्हाला स्पष्ट झाले. त्यानंतर आम्ही दुसरे शासकीय वाहनात असलेले पथकास बोलावून घेतले आणि पंच व तक्रारदार तसेच पोलीस पथकास पुढील सापळा कारवाईच्या अनुषंगाने आवश्यक त्या सर्व सुचना दिल्या. त्यानंतर मी तक्रारदार श्री. मकसुद मुल्ला यांना लाचेच्या रक्कमे बाबत विचारणा केली असता, तक्रारदार यांनी त्यांचेकडील बचतीतील रूपये ४,०००/— इतकी रक्कम त्यांच्याकडे उपलब्ध असल्याचे सांगितले. वेळेच्या अभावी मी तक्रारदार यांचेकडील रू. ४,०००/— (त्यामध्ये रू. ५००/— दराच्या भारतीय चलनाच्या ८ नोटा) यांचा पचांसमक्ष माझे मोबाईलव्दारे फोटो काढला. तसेच एका कोऱ्या कागदावर सदरच्या नोटांचे सिरियल क्रमांक लिहीले व त्यावर मी व दोन्ही पंचांनी सहया केल्यानंतर तो कागद माझे ताब्यात घेतला.

त्यानंतर मी दोन्ही पंच व तक्रारदार यांना अॅन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावून सांगितले. पोशि चालक गारळे यांनी लाच म्हणून वापरण्यात येणाऱ्या रूपये ४,०००/— (त्यामध्ये रू. ५००/— दराच्या भारतीय चलनाच्या ८ नोटा) रक्कमेच्या नोटांना अॅन्थ्रासिन पावडर लावून ती लाचेची रक्कम तक्रारदार श्री. मकसुद मुल्ला यांनी परिधान केलेल्या सफेद रंगाच्या कुर्त्याच्या उजव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवली. त्यानंतर पोशिचा गारळे हे सापळा कारवाईमध्ये प्रत्यक्ष भाग घेणार नसल्याचे सांगितले. तद्नंतर मी, लोकसेवक श्री. मिथुन आडे यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर तक्रारदार यांनी त्यांच्या डोक्यावरील टोपी काढुन, ती चेहऱ्यावर फिरवून सापळा पथकाला दिसेल अशाप्रकारे लाच स्विकारल्याचा इशारा करण्याबाबत तक्रारदार यांना सांगितले.

मी व सपोआ मानसिंग पाटील यांनी तक्रारदार, पंच व पथक यांना सापळा कारवाईच्या पुन्हा आवश्यक त्या सुचना दिल्या. मी, डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून पो.ह. गायकवाड यांनी तक्रारदार यांनी परिधान केलेल्या कुर्त्याच्या आतील बाजुस बनियानला कोणास दिसणार नाही किंवा संशय येणार नाही अशा पध्दतीने अडकविला. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.०१ श्री. करडे हे लोकसेवक यांना प्रत्यक्ष भेटण्यासाठी लोकसेवक कार्यरत असलेल्या कार्यालयाच्या दिशेने रवाना झाले. त्यांच्या मागोमाग आम्ही पथक व पंच क्र.०२ श्रीमती मलबारी असे ऑटो रिक्षाने रवाना झालो. तक्रारदार श्री मकसुद मुल्ला हे पंच श्री. करडे याचेसह प्रादेशिक परिवहन कार्यालय, बोरीवली कार्यालयाचे आत गेले. त्यावेळी सपोआ पाटील व सापळा पथकातील काही अंमलदार हे ठरल्याप्रमाणे प्रादेशिक परिवहन कार्यालय, बोरीवली कार्यालयाच्या आवारात कोणासही संशय येणार नाही अशाप्रकारे थांबून राहीले. त्यानंतर तक्रारदार हे लोकसेवक मिथुन आडे यांना भेटण्याकरीता ते उपस्थित असलेल्या खटला विभाग कक्षामध्ये गेले. त्यावेळी मी व पथकातील पो.ह. साटम व पो.ह. गावडे हे खटला विभागाचे बाहेरील मोकळया पॅसेंजमध्ये कोणासही संशय येणार नाही अशा रितीने थांबुन राहीलो.

काही वेळाने तक्रारदार श्री. मकसुद मुल्ला व पंच श्री. करडे हे लोकसेवक श्री. मिथुन आडे कार्यरत असलेल्या कक्षाच्या बाहेर आले व तक्रारदार श्री. मुल्ला यांनी सापळा पथकास दिसेल अशाप्रकारे लाचेची रक्कम स्विकारल्याबाबत पुर्व नियोजीत इशारा केला. त्यानंतर लगेच मी व सोबत असलेल्या सापळा पथकातील पो.ह. साटम व पो.ह. गावडे यांनी लागलीच लोकसेवक मिथुन आडे यांचे कक्षामध्ये प्रवेश केला. पंच क्र. ०१ श्री. करडे यांनी लोकसेवक मिथून आडे यांचेकडे हाताने इशारा करून लाचेची रक्कम स्विकारल्याचे सांगितले. पो.ह. गायकवाड यांचे मदतीने तक्रारदार यांचेकडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढून तो मी बंद करून माझे ताब्यात ठेवला. त्यावेळी १६:०६ वाजले होते. आम्ही व पथकाने लोकसेवक मिथुन आडे यांना १६.१० वाजता ताब्यात घेतले. आरोपी लोकसेवक मिथुन आडे यांस मी व सपोआ पाटील यांनी स्वत:ची ओळख सांगितली. त्यानंतर आरोपी लोकसेवक मिथुन आडे यांना त्याचे पुर्ण नाव व पत्ता विचारले असता, त्यांनी त्याचे पुर्ण नाव मिथुन विलास आडे, वय ३७ वर्षे, पद— लिपीक टंकलेखक, प्रादेशिक परिवहन विभाग, बोरीवली राठि. फ्लॅट नं. डी/६०४, सहावा मजला, राज इस्टेट, काशीगाव, मिरारोड पुर्व, जि.ठाणे असे सांगितले.

मी आरोपी लोकसेवक मिथुन आडे यांस पंचासमक्ष लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता, त्यांनी लाचेची रक्कम त्यांनी परिधान केलेल्या शर्टच्या डाव्या खिश्यात ठेवल्याचे सांगून स्वत:च्या हाताने सदर लाचेची रक्कम परिधान केलेल्या शर्टच्या डाव्या खिश्यातून काढून पंच क्र. २ श्रीमती मलबारी यांचेकडे दिली. सदर लाचेच्या रकमेची पंच क्र. २ श्रीमती मलबारी यांनी पहाणी केली असता, रूपये ५००/— दराच्या भारतीय चलनाच्या ८ नोटा, असे एकुण रूपये ४०००/— असल्याचें

PI

त्यांनी सांगितले. सदर लाचेच्या रक्कमेतील नोटांचे नंबर व कागदावर लिहीलेले सिरियल क्रमांक तंतोतंत मिळून आले.

त्यानंतर मी व सपोआ पाटील यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे श्री. मिथुन आडे कार्यरत असलेल्या कक्षाचे लाईट्स बंद करून काळा कपडा भोवताली पकडून कृत्रीम

पो.नि. निता तुकाराम भोसले यांचा दि. ०२/०६/२०२६ रोजीचा जबाब पुढे चालु..

अंधार तयार करून पंचासमक्ष व कार्यालयातील इतर लोकसेवक श्री. विनायक केशव आंब्रे, पद – कार्यालयीन अधिक्षक आस्थापना व श्री. केदार आत्माराम लवेकर, पद – कार्यालयीन अधिक्षक खाजगी वाहन विभाग यांचेसमक्ष मी अल्ट्रव्हायलेट दिव्याच्या सहाय्याने लोकसेवक मिथुन आडे यांच्या हाताची व परिधान केलेल्या कपडयाची तपासणी केली असता, लोकसेवक मिथुन आडे यांच्या दोन्ही हाताच्या बोटांना व तळहातास तसेच त्यांनी परिधान केलेल्या शर्टच्या डाव्या खिशाचे तोंडाजवळ व आतील बाजुस फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर माझ्या सूचनेनुसार तक्रारदार यांना कक्षात बोलावुन काळा कपडा भोवताली पकडून कृत्रीम अंधार तयार करून पो.ह. गावडे यांनी अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या सहाय्याने तक्रारदार यांच्या हाताची व परिधान केलेल्या कपडयाची तपासणी केली असता, तक्रारदार यांच्या उजव्या हाताच्या बोटांना व तळहातास फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसुन आली. तसेच जप्त करण्यात आलेल्या लाचेची रक्कमेची पाहणी केली असता, लाचेच्या नोटांवर फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसुन आली.

त्यानंतर लोकसेवक मिथुन आडे यांना ताब्यात घेवुन लाप्रवि कार्यालयात परत आलो व सापळा कारवाईबाबत सविस्तर पंचनामा केला.

तरी तक्रारदार श्री. मकसुद मुल्ला यांनी दिनांक ०१/०६/२०२६ रोजी दिलेल्या तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या पडताळणी/सापळापुर्व कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक मिथुन विलास आडे, पद–लिपीक टंकलेखक, नेमणुक– प्रादेशिक परिवहन कार्यालय, बोरीवली, मुंबई यांनी तक्रारदार यांचे बस क्र. एमएच–०२–एफजी–२९७३ वरील फाईन कमी करून देण्याकरीता तक्रारदार श्री. मकसुद मुल्ला यांचेकडे स्वत:करीता व त्यांचे वरिष्ठ अधिकारी श्री. श्याम कासार, सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचेकरीता रूपये ५,०००/–लाचेची मागणी करून तडजोडी अंती ४०००/– रूपये लाचेची मागणी केली, तसेच सापळा कारवाई दरम्यान मागणी केलेली लाचेची रक्कम रूपये ४०००/– स्विकारली म्हणुन माझी लोकसेवक मिथुन विलास आडे, पद–लिपीक टंकलेखक, नेमणुक– प्रादेशिक परिवहन कार्यालय, बोरीवली यांच्याविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ अन्वये कायदेशीर फिर्याद आहे.

माझा जबाब संगणकावर मराठीत टंकलिखीत केला असुन, तो मी सांगितल्याप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष,

( प्रबिण पावले )
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

PI
(निता भोसले)
पोलिस निरीक्षक,
ला.प्र.वि. मुंबई.

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ...... तक्रार अर्जावरून पडताळणी केल्यामुळे.
Reasons for delay in reporting by the complainant/informant

9\. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील ( आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा ) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10\. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ...... ४०००/- रु. (५००/- रु दराच्या भारतीय चलनाच्या आठ नोटा)
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties) – वरीलप्रमाणे.

11\. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ......
Unnatural / Accidental Death Case No., if any.

12\. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा ) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील तक्रारदार यांचा शाळेकरीता बसेस पुरविण्याचा व्यवसाय असून तक्रारदार यांचे बस क्र. MH 02 FG 2973 वर दि. 19/06/2024 रोजी आर.टी.ओ. बोरीवली येथील अधिकारी यांनी विनावाहन परवाना, विमा प्रमाणपत्र नसणे, असुरक्षित वाहन, चालक बॅच आणि लायसन्स नसल्याने २६,५००/- रु. इतका दंड आकारला. तक्रारदार दि. 27/06/24 रोजी प्रा.प.वि. बोरीवली येथे गेले असता लोकसेवक मिथुन आडे, सदर विभाग, लिपिक टंकलेखक यांना भेटले असता त्यांनी दंडाची रक्कम कमी करण्याकरीता, स्वतःकरीता तसेच त्यांचे वरिष्ठ अधिकारी यांचेकरीता रु. ५०००/- इतक्या लाचेची मागणी करून तडजोडीअंती एकूण ४०००/- रु. लाचेची रक्कम स्विकारली म्हणून भ्र.प्र. अधिनियम 1988 कलम 7 अन्वये गुन्हा नोंद.

13\. **केलेली कार्यवाही** –1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : ...... प्रवीण पावले, सहाय्यक पोलीस आयुक्त, ला.प्र.वि. मुंबई.

2\. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, —

3\. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ...... — ...... जिल्हा ...... राज्य ......

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O) .............. Rank ............. No. ...........
to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ...............................................

(3) Transferred to P. S. ..................................
District .................................. on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.
(R.O.A.C.)

14\. तक्रारदाराची सही व अंगठा PI N.T. Bhosale
Signature and Thumb impression of the Complainant/Informant

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही
Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name ...... प्रवीण पावले
पदनाम Rank ...... सहाय्यक पोलीस आयुक्त
तपासिक अ. चा कोड क्र. ...... ला.प्र.वि. मुंबई.
Posting
Code No. of I. O. ......

15\. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ०२/०६/२०२४
1\. Date and time of submitted to the Court.

प्रत 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक ( संगणक ), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of First Information Report